संपूर्ण महाराष्ट्रात वितरीत होणारे साप्ताहिक

कराड वैभव

सातारा जिल्ह्यातील कौटुंबिक वृत्तपत्र

वार्षिक वर्गणी रु. २००/- फक्त
आजिवन वर्गणी रु. २०००/- फक्त
आपण आमच्या ज्ञान यज्ञास सहकार्य करावे.

चेक किंवा डि.डि. Weekly Karad Vaibhav या नावे काढावा.
कॅनरा बँक शाखा : वसंतगड, कराड.
A/c No. : 4512201000030 IFSC Code : CNRB0004512
संपर्क क्र. : ९४०४४६५७००/९८२३०८८५०
इमेल : dhananjay_sinhasane@yahoo.com
वेब साईट : www.karadvaibhav.com

संपूर्ण महाराष्ट्रात वितरीत होणारे साप्ताहिक — सातारा जिल्ह्यातील कौटुंबिक वृत्तपत्र

# कराड वैभव

संपादिका : सौ. शैलजा धनंजय सिंहासने

आपले साहित्यीक होण्याचे स्वप्न सत्यात उतरवा

लेखक, कवी, कथा-कादंबरीकार, गझलकार यांनी संपर्क साधावा

महिला साहित्यीकांना विशेष सवलत

संपर्क क्र. : ९४०४४६५७००/९८२३०८८५०५
इमेल : dhananjay_sinhasane@yahoo.com
वेब साईट : www.karadvaibhav.com

Post Lic No. : KRDDN/20/2025-27 Website - www.karadvaibhav.com RNI No. 50034/1988

वर्ष ३७ वे ❋ अंक ४५ ❋ दिनांक : २८ ऑगस्ट ते ३ सप्टें. २०२५ ❋ संपर्क क्र. ९८२३०८८५०५ ❋ वार्षिक वर्गणी रु. २००/- स्वागत मुल्य २ रु.


## वार्षिक पत आराखड्याचे लोकार्पण

सातारा : जिल्ह्यात सन २०२५-२०२६ साठी पीककर्ज वितरणाचे ३८०० कोटींचे उद्दिष्ट असून जुलै अखेर २ लाख ४९ हजार १८६ खातेधारकांना खरिपासाठी १८१२ कोटी रुपयांचे पीक कर्ज वितरीत करण्यात आले. पीक कर्ज वितरणाचे जिल्ह्याचे उद्दिष्ट शंभर टक्के पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी दिले. जिल्हा अग्रणी बँक आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी संतोष पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

यावेळी सातारा जिल्ह्याचा २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचा १९९०० कोटी रुपयांचा वार्षिक पत आरखड्याचे लोकार्पण करण्यात आले. या प्रसंगी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे विजय कोरडे, बँक ऑफ महाराष्ट्रचे अंचल प्रबंधक सौरभ सिंग, जिल्हा उपनिबंधक श्री संजय सुद्रीक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाचे अंकुश मोटे, नाबार्डचे प्रबंधक दिपाली काटकर, सातारा जिल्हा मध्यवर्ती बँक महाव्यवस्थापक राजेंद्र भिलारे, अग्रणी बँक व्यवस्थापक नितीन तळपे यांच्यासह विविध बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी बँकिंग क्षेत्राने सकारात्मक दृष्टीकोन ठेवून काम करणे आवश्यक आहे, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. पाटील म्हणाले, उद्योग वाढ, रोजगार निर्मिती, विहित मुदतीत पीक कर्जाचे वितरण उद्दिष्ट पूर्ण करणे यासाठी संबंधित यंत्रणांनी कार्य करावे. विविध महामंडळाकडील उद्योग व्यवसायासाठीच्या प्रकरणांमध्ये सकारात्मक भूमिका घ्यावी, अशा सूचनाही जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी केल्या.

जिल्हासाठी करण्यात आलेल्या वार्षिक पत आराखड्यामध्ये कृषी क्षेत्रासाठी ६ हजार ३०० कोटी व बिगर कृषी क्षेत्रासाठी ३ हजार ३०० कोटी, इतर प्राधान्य क्षेत्रासाठी ४ हजार ३०० कोटी असे एकूण प्राथमिकता क्षेत्रा करीता १३ हजार ९०० कोटी व गैर प्राथमिकता क्षेत्रासाठी ६ हजार कोटी उद्दिष्ट देण्यात आले आहे. तर पीक कर्जासाठी ३ हजार ८०० कोटीची तरतूद कृषी क्षेत्रामध्ये केलेली आहे.

जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी सर्व बँकांचा दिनांक ३१ जुलै पर्यंतचा पीक कर्ज वाटपाचा आढावा घेऊन प्रामुख्याने ज्या बँकांचे पीक कर्ज वाटप कमी आहे त्या बँकांना पीक कर्ज वाटपाच्या सक्त सूचना केल्या. तसेच अनेक बँका अतिशय कमी प्रमाणात कर्ज वाटप करत आहेत याबद्दल सुधारणा करणे गरजेचे असल्याचे असल्याचेही जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी सांगितले.

उद्दिष्ट पुर्ती केलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र, जिल्हा मध्यवर्ती बँक, बँक ऑफ इंडिया, आयडीबीआय, कोटक महिंद्रा बँक, यूनियन बँक ऑफ इंडिया व जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यांना प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले.

अग्रणी बँक व्यवस्थापक श्री. तळपे यांनी सभेचे विषयावर सादरीकरण केले. नितीराज साबळे यांनी सर्वांचे स्वागत व आभार प्रदर्शन केले.

## सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी उत्कृष्ट गणेशोत्सव स्पर्धेसाठी अर्ज करावेत - जिल्हाधिकारी संतोष पाटील



सातारा : गणेशोत्सवात उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देण्याचा निर्णय पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने घेतला आहे. इच्छुक गणेशमंडळांनी गणेश चतुर्दशीच्या निर्धारित मुदतीत ारहेीींरीं.श्रिवरसारळश्र.लो या ईमेलवर अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी केले आहे.

यासाठी तालुकास्तरावर प्रथम पारितोषिक २५ हजार, जिल्हास्तरावर ५० हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक, ४० हजार रुपयांचे द्वितीय पारितोषिक, ३० हजार रुपयांचे तृतीय पारितोषिक, राज्यस्तरावर ७ लाख ५० हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक, ५ लाख रुपयांचे द्वितीय पारितोषिक, २ लाख ५० हजार रुपयांचे तृतीय पारितोषिक व उर्वरित ३३ जिल्हा विजेते प्रत्येकी ५० हजार मानधन व प्रमाणपत्र अशी एकूण १ कोटी ५० लाख रुपयाचे पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे.

स्पर्धेसाठी निकष पूढीलप्रमाणे आहेत. कला व सांस्कृतिक कार्यक्रम-२० गुण, संस्कृतीचे जतन-संवर्धन, निसर्ग व सार्वजनिक संपत्ती जतन-२० गुण, सामाजिक उपक्रम २० ते २५ गुण, पर्यावरणपुरक आयोजन व नवोपक्रम-२० गुण, महिला प्रतिनिधीत्व किमान ३० टक्के असणे अपेक्षित आहे.

हा मागील वर्षीच्या अनंत चतुर्दशीपासून ते चालू वर्षीच्या अनंत चतुर्दशीपर्यंत केलेले कार्य असा मुल्य मापनाचा कालावधी असेल.

गणेशोत्सवात उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्याकरिता स्पर्धा आयोजन करून अभिप्रायासह गुणांकन करून प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय व राज्यस्तरावरील समिती गठित करण्यात आली आहे.

ही समिती मंडळाच्या उत्सवस्थळी प्रत्यक्ष भेट देणार आहे. समितीकडून प्रत्येक गणेशोत्सव मंडळाबाबत अभिप्रायासह गुणांकन करून गणेशोत्सव मंडळाची शिफारस करून त्यांची नावे सर्व कागदपत्र व्हीडिओसह राज्य समितीकडे देतील.

जिल्हाधिकारी यांच्या मार्फत, संचालक, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्याकडे सादर करतील. निकालासंदर्भात स्वतंत्र सूचना देण्यात येतील.

जास्तीत जास्त मंडळांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी श्री.पाटील यांनी केले आहे.

## जमीन न मिळालेल्या कोयना धरणग्रस्तांनी जमिनीसाठी अर्ज करावे - पालकमंत्री शंभूराज देसाई

सातारा : कोयना धरणामध्ये जमिन गेली आहे परंतु अद्यापपर्यंत जमिन मागणीसाठी अर्ज केला नाही अशा धरणग्रस्तांनी जमिन मागणीचा अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावा. महसूल प्रशासनाने पसंतीच्या जमिनी दाखविण्यासाठी विशेष शिबीराचे आयोजन करावे, असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

पालकमंत्री कार्यालयात कोयना धरणग्रस्तांच्या पुनर्वसन व महिंद प्रकल्प ग्रस्तांना भूखंड वाटपाबाबत आढावा पालकमंत्री श्री. देसाई यांनी घेतला. या आढावा बैठकीला जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, अप्पर जिल्हाधिकारी मल्लिकार्जुन माने, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष रोकडे, पाटणचे प्रांताधिकारी सोपान टोणपे, अतुल म्हेत्रे, तहसीलदार अनंत गुरव, धरणग्रस्त उपस्थित होते.

कोयना धरणग्रस्तांचे मुळ मालक हयात नाही अशांच्या वारसांनी अर्ज करावेत, असे सांगून पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, ज्यांना अद्याप पर्यंत जमिनींचे वाटप झाले नाही अशांनी तात्काळ जमिनीची पसंती सांगावी.



ज्या धरणग्रस्तांकडे कागदपत्रे नाही अशांना प्रशासनाकडील उपलब्ध असेलेली कागदपत्रेही देण्यात येतील. कोयना धरणग्रस्तांना सुलभपणे प्रकल्पग्रस्तांचे दाखल मिळावे यासाठी नियमात बदल करण्यात आला आहे. त्यामुळे प्रकल्प ग्रस्तांना सहज दाखले उपलब्ध होत असल्याने याचाही लाभ घ्यावा, असेही पालकमंत्री श्री. देसाई यांनी बैठकीत सांगितले. महिंद प्रकल्पांतर्गत बोर्गेवाडीचे पुनर्वसन पाटण तालुक्यातील मौजे चांगुलेवाडी व सांगवड येथे करण्यात आले आहे. शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे प्रकल्प ग्रस्तांना दोन एकर जमिन व ३७० चौरस फुटाचा भूखंड उपलब्ध करुन द्यावा,अशा सूचना पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिल्या.

महिंद प्रकल्पांतील प्रकल्प ग्रस्तांच्या विविध सुविधांचा आढावा घेतला.

या पुर्नवसित नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची विहिर व रस्ता तयार करण्यात आला होता. त्या जागेची मोजणी करुन हद्द निश्चित करावी.

ज्या प्रकल्प ग्रस्तांना जमिनी मिळाल्या नाहीत त्यांना गणेशोत्सवानंतर जमिनी दाखविण्याचा कार्यक्रम हाती घ्यावा. तसेच उदानिर्वाह भत्याचा प्रस्तावही सादर करावा, अशा सूचनाही त्यांनी केल्या.


**साप्ताहिक कराडवैभवचे सर्व वर्गणीदार, जाहिरातदार, वाचक व हितचिंतक यांना गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा**

साप्ताहिक कराडवैभवचा अंक पाहण्यासाठी
https://karadvaibhav.in/ वापर करावा



## भावपुर्ण श्रध्दांजली !



आमचे पिताश्री स्व. श्रीरंग विष्णु निकम यांचे रविवार दि. १७ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वा. अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचे उत्तरकार्य (तेरावा दिवस) शुक्रवार दि. २९ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वा. घरी (ॐ श्री बंगला, गणपती मंगल कार्यालया पाठीमागे गजानन हौसिंग सोसायटी, ओगलेवाडी रोड, कराड) येथे होणार आहे.

**शोकाकुल**

श्रीमती आक्काताई श्रीरंग निकम,
प्रशांत श्रीरंग निकम, प्रविण श्रीरंग निकम
सौ. प्रतिभा अनिल जाधव व
समस्त निकम, जाधव व मित्र परिवार

हे पत्रक मालक, प्रकाशक व संपादक सौ. शैलजा धनंजय सिंहासने यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, शिवगंगा चेंबर्स, ६८६, बुधवार पेठ, पुणे-०२ येथे छापून १९२, मंगळवार पेठ, कराड ४१५ ११० येथुन प्रकाशित केले.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. वाद-विवाद कराड न्याय कक्षेत

RNI. No. : MAH/MAR/50034/88

**कार्यकारी संपादक : धनंजय सिंहासने**
मोबा. : ९८२३०८८५०५ ई.मेल : karad_vaibhav@yahoo.com
**विभागीय कार्यालय :** बी-२७०१, पंचम सोसायटी, नांदेड सिटी, पुणे ४११ ०६८. मोबाईल - ९८२३०८८५०५

# संपादकीय

## गणपती बप्पा मोरया !



बुधवार दि. २७ ऑगस्ट २०२५ गणेशचतुर्थीपासून गणेशोत्सवास सुरूवात झाली आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने गणेशोत्सव साजरा करताना अनेक गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे. आजच्या परिस्थितीमध्ये सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी जास्तीत जास्त सामाजिक उपक्रमांना प्राधान्य देऊन गणेशोत्सव साजरे करावेत. सार्वजनिक गणेशोत्सवाचे मुळ कल्पना मांडणारे व अमलात आणणारे थोर स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य टिळक यांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरूवात केली. त्याचा मुळ संकल्प म्हणजे समाजसुधारणा ही होती. समाजातील सर्वसामान्य व्यक्तिला शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक क्षेत्रात प्रगती पथावर नेण्याचा हा एक राजमार्ग होता या विचारास अनुसरून सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी आपापल्या परिसरात काम करावे ही सर्वसामान्यांची अपेक्षा आहे. सार्वजनिक गणेशोत्सवात डीजी सारख्या कर्कश्श आवाजाचा उपयोग न करता ध्वनि प्रदुषणाला विरोध केला पाहिजे. आजपर्यंत आपण अनेक सार्वजनिक गणेशोत्सव यापुर्वि पाहिले आहेत. डीजीसारख्या कर्कश्श आवाजाने समाजातील ज्येष्ठ नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागते. अनेक ज्येष्ठ नागरिकांना या कर्कश्श आवाजाने हृदयविकाराचा झटका येऊन आपला जीव गमवावा लागला आहे. अनेकांचे कान बधिर झालेले आहेत. सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी डीजीचा वापर न करता भारतीय संस्कृतीतील वाद्यांचा उपयोग करावा. जेणेकरुन सर्वसामान्य जनतेस त्याचा त्रास न होता एकप्रकारे आनंद मिळेल. विशेष करुन सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी ढोल-ताशा, लेझीम, भारतीय वाद्ये यांचा वापर करावा. त्यामुळे आपल्या बंधु-भगिनींना रोजगार उपलब्ध होऊन त्यांना आर्थिक मदत मिळेल. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी समाजामध्ये रक्तदान, युवक रोजगार विषयक प्रदर्शने व व्याख्याने आयोजित करावीत. तसेच सार्वजनिक गणेशोत्सवांनी नविन पिढीला व्यसनापासून दूर राहण्यासाठी विशेष कार्यक्रम आयोजित करावेत. आपला भारतदेश जगात अग्रक्रमावर यावयाचा असेल तर त्यासाठी आपल्या देशातील युवा पिढी आरोग्य संपन्न असणे गरजेचे आहे. आज भारतासारख्या बलाढ्य देशात मानव संसाधन फार मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे परंतु त्यांना योग्य दिशा देणे ही काळाची गरज आहे.

ई निविदा सूचना क्र. १४/२०२५-२६ दुबार

**संक्षिप्त निविदा सुचना**

कार्यकारी अभियंता, कोल्हापूर विद्युत विभाग, कोल्हापूर हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (विद्युत विभाग) खात्याकडून शासन निर्णयानुसार आवश्यक त्या वर्गातील नोंदणीकृत व तत्सम कामाचा अनुभव असलेले कंत्राटदार यांचेकडून ब-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahapwd.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, कोल्हापूर विद्युत विभाग, सा.बां. खाते, कोल्हापूर यांनी राखुन ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.
कामाचे नाव :- सातारा जिल्ह्यातील विद्युतीकरणाची एकूण ०१ काम
निविदा उपलब्ध कालावधी :- दि. १७.०८.२०२५ ते दि. ०३.०९.२०२५
ई - निविदा उघडणे : दि. ०५.०९.२०२५ https://mahapwd.gov.in या संकेतस्थळावर निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे. निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास संकेतस्थळावरती कळविण्यात येईल.)

SANJIVANI DHANANJAY KATTI

कार्यकारी अभियंता,
कोल्हापूर विद्युत विभाग (सा.बां.), कोल्हापूर

जिमाका/सातारा/जा/१५१/२०२५-२०२६

## लोकांची गैरसोय टाळण्यासाठी यंत्रणांनी दक्ष रहावे, अधिकाऱ्यांनी मुख्यालय सोडू नये

सातारा : कोयना धरणासह जिल्ह्यातील विविध प्रमुख धरणांच्या पाणलोट क्षेत्रात १६ ऑगस्टपासून पावसाचा जोर वाढत असून सद्य स्थितीत कोयना धरणात जवळपास १०० टीएमसी साठा होत आला आहे. कोयना धरणाची साठवण क्षमता १०५ टीएमसी आहे. कोयना धरणात ८१ हजार क्युसेक पाण्याचा येवा होत असून पाणी पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी धरणाचे ६ वक्र दरवाजे ९ फुटांवरुन ११ फुटांपर्यंत उघडण्यात येणार आहेत. व आज दुपारपासूनच धरणातील पाण्याचा विसर्ग ८० हजार क्युसेक करण्यात येणार आहे. त्यामुळे पावसाचा जोर असणाऱ्या व धरणातून होणाऱ्या विसर्गामुळे बाधित होणाऱ्या लोकांना आवश्यकता भासल्यास स्थलांतरित करण्यासाठी यंत्रणांनी आवश्यक ती सर्व तजवीज ठेवावी. जलसंपदा विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांनी तातडीने आपल्या धरण कार्यस्थळावर थांबावे. कोणत्याही स्थितीत लोकांची गैरसोय होणार नाही यासाठी सर्व तालुकास्तरीय आणि क्षेत्रिय यंत्रणानी दक्ष रहावे. कोणीही मुख्यालय सोडू नये, असे स्पष्ट निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दुरदृश्यप्रणालीवरुन जिल्ह्यातील पर्जन्यस्थितीचा आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता श्री. काटकर, कोयना धरण विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. महेश राशणकर यांच्यासह कराडचे प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे, पाटणचे प्रांताधिकारी सोपान टोम्पे, तहसीलदार अनंत गुरव आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील पर्जन्य स्थितीचा व संभाव्य पूरस्थितीचा आढावा घेऊन पालकमंत्री श्री.देसाई म्हणाले, कोणत्याही स्थितीत पावसाचा जोर वाढला तरी परिस्थिती गंभीर होऊ नये यासाठी धरण व्यवस्थापनाने पाण्याचे विसर्गाचे काटेकोर नियोजन करावे. जिल्ह्यात पावसाचा वाढता जोर पाहता नदी काठच्या लोकांनी सतर्क रहावे, नदीकाठी पाण्यात जाऊ नये, प्रशासनाच्या आवाहनाला सहकार्य करावे. सर्व स्थितीत प्रशासन तुमच्या बरोबर आहे. या भागात पोलीसांनी रात्रीची गस्त वाढवावी. जिल्हा परिषदेने ग्रामीण आरोग्य केंद्रामध्ये आवश्यक औषधसाठा उपलब्ध ठेवावा. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी कार्यस्थळांवर २४*७ तास उपस्थित रहावे. साथीचे रोग, अतिसार, ताप थंडी अशा सर्व आजारांवरील औषधे उपलब्ध ठेवावीत. ॲब्युलंस उपलब्ध ठेवाव्यात. विद्यूत पुरवठा खंडीत होऊ नये यासाठी जनरेटर सेट उपलब्ध ठेवावेत. विद्यूत विभागाने दुर्गम भागातील वीज पुरवठा सुरळीत राहावा यासाठी दक्ष राहावे. लोकांची गैरसोय होऊ नये म्हणून संबंधित यंत्रणांनी आपली पथके कार्यरत ठेवावीत असे सांगून पालकमंत्री म्हणाले, आवश्यकतेनुसार लोकांना स्थलांतरीत करत असताना त्यांना अंथरुण पांघरुन, स्वच्छ पिण्याचे पाणी, जेवण, औषधे यांची तजवीज ठेवावी. गरजेच्यावेळी उपयोगात आणण्यासाठी कोयनानगर कॉलनीतील रिकाम्या क्वार्टर्सही सुस्थितीत ठेवण्याच्याही सूचना पालकमंत्री यांनी दिल्या. तसेच झाडे-झुडपे रस्त्यावर उन्मळून पडल्याने, दरड कोसळल्याने वाहतुकीस अडथळा होत असल्यास जेसीबी लावून तात्काळ रस्ता मोकळा करावा व वाहतूक सुरळीत करावी, ज्या ठिकाणी रस्ते पाण्याखाली जात आहेत, गावांचे संपर्क तुटत आहेत अशा ठिकाणी धोक्याच्या सूचनांचे फलक लावावेत अशा सूचनाही पालकमंत्री श्री. देसाई यांनी दिल्या.

सद्यस्थितीत कोयना धरणाचा जवळपास १०० टीएमसी साठा होत आला असून कोयनाधरणस्थळावर उद्या जलपूजन करुन ठिकठिकाणी असणाऱ्या परिस्थितीची पाहणी करण्यात येईल, असेही पालकमंत्री श्री. देसाई यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी जिल्ह्यातील विविध धरणांमधील पाणीसाठा, येवा, विसर्ग, धरण पाणलोटक्षेत्रात पडणारा पाऊस तसेच पाटण, नवजा, तापोळा, कोयना, दरे, महाबळेश्वर, सातारा, केळघर, मेढा, जावळी आदी विविध ठिकाणच्या पर्जन्य स्थितीची माहिती पालकमंत्री श्री. देसाई यांना दिली. कृष्णा कोयना काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून सर्व अधिकारी फिल्डवर राहतील, असेही निर्देशित केले.

## ६ सप्टेंबर अखेर भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १६३ लागू

सातारा - सातारा जिल्हयात दिनांक ८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत गोकुळअष्टमी, दहिहंडी, गणेश मुर्ती आगमन, गणेश मुर्ती विसर्जन, गणेशोत्सव असे उत्सव साजरे होत आहेत. उत्सवांमध्ये मिरवणुक प्रसंगी विविध गणेश मंडळे त्यांच्या वाद्यांमध्ये व स्टेरिओ सिस्टीमध्ये प्लाझमा, बीम लाईट, लेझरबीम लाईट व प्रेशरमिडचा वापर करतात, यामुळे श्रवणयंत्रावर, डोळयांवर, हृदयास इजा होवुन त्यांचे आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही व अशी परिस्थीती निर्माण होण्याची शक्यता तसेच रस्त्यावरुन जाणारे वाहन चालकांचे वाहनावरील नियंत्रण सुटुन अपघात घडून अनुचित प्रकार व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम १६३ प्रमाणे वापरास प्रतिबंध करत असल्याचे आदेश तुषार दोशी यांनी आदेश निर्गमित केले आहेत.

# कराड नगरीतील सुप्रसिध्द नागरिक, पोलिस दलातून पोलिस अधिकारी म्हणून सेवानिवृत्त झालेले श्री. श्रीरंग विष्णु निकम यांचे रविवार दि. १७ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले त्यांच्या आठवणीवर त्यांचे चिरंजीव श्री. प्रशांत श्रीरंग निकम यांनी लिहलेला विशेष लेख




सैलभर वाटणारी मिठी
घट्ट काळजाशी बिलगली होती ।
स्पर्शाची चाहूल त्यांनिही
मिटल्या पापणीने जानली होती ।
हुरहुर वाढवणारी भीती
कुशीत शिरताच निवळली होती
भेदरलेली हळवी ती चाहूल
वडीलांच्या कुशीत विसावली होती ।

दादा तुमच्या दिव्य आत्म्यास शांती लाभो

आज आमच्या वडील्यांच्या निधनानंतर मी हा लेख त्यांच्या स्मृतींना समर्पित करत आहे. आमच्या आयुष्यात त्यांचे स्थान फार मोठे आहे.

श्रीरंग विष्णू निकम जन्म १ जुन १९५० धडाडते व्यक्तीमत्व जन्मास आले आणि १७ ऑगस्ट २०२५ रोजी शांत झाले. त्यांचे वडील पोलीस डिपार्टमेंटमध्ये असल्या कारणाने नोकरी निमीत्त बाहेर गावी त्यांचे फिरणे झाले, त्यामध्ये इयत्ता ४थी मध्ये त्यांच्या आईचे छप्पर डोक्यावरून निघुन गेले.

आईनंतर आजीच्या मिळणाऱ्या संस्कारावर, प्रेमावर त्यांचे संगोपन आणि शिक्षण चालू राहीले, त्यांच्याबरोबर बोलत असताना पदोपदी आयुष्यात आलेल्या खडतर प्रसंगांचा तसेच त्यांच्यावर शिताफीने, आणि प्रामाणिक प्रयत्नाने त्यावर केलेली मात यामध्ये त्यांची कमालीची जिद्द दिसुन येत होती.

वडीलांच्या तुटपुंज्या पगारावर शिक्षण पूर्ण करताना परीस्थीतीची पुर्ण जाणीव असणारे आमचे वडील यांनी मिळेल त्यावेळेत, मीळेल ती कामे करून वेळप्रसंगी त्यांनी सकाळच्या दुधाच्या बाटल्या घरोघरी वाटप केल्या तसेच रिक्षाही चालवली आणि सायंकाळच्या वेळेस पान टपरीवर बसून आपल्या शिक्षणाचा ध्यास पूर्ण केला. शिक्षणासाठी व घरासाठी हातभार लावत आईच्या सहवासा शिवाय ११वी पर्यंत शिक्षण पूर्ण केले. वडील पोलीस असल्याने त्या नोकरीला आदर्श मानून ते पोलीस झाले व पुढे त्यांनी अधिकारी पदापर्यंत मजर मारली. पोलीसाची नोकरी करताना आयुष्यात आलेल्या बऱ्यावाईटाच्या अनुभवाची शिदोरी घेऊन संसारास सुरुवात केली, संसारास मोलाची साथ आणि प्रेमळ सहवास आमची मातोश्री सौ. आक्काताई हीने दिली.

त्यांच्या वयाच्या अतिशय लहानपणीच आईची माया सहवास हरवल्याने स्वभावात आलेला बदल, हट्टी आणि रागीट स्वभाव, कोणावर विश्वास ठेवण्यासाठी त्यांनी घेतलेला वेळ, व माणसे, व त्यांचा हेतू प्रकर्शाने जाणवणारा स्वभाव हे त्यांचे वैशिष्ठ्य ठरले. माणूस पारखण्यात अव्वल असणाऱ्या या अवलीयास मानाचा मुजरा!

नोकरी आणि संसार सांभाळताना देवाच्या कृपेने त्यांना एक कन्यारत्न (प्रतिभा) आणि दोन पुत्ररत्न (प्रशांत, प्रविण) पदरात प्रसादाच्या रुपाने प्राप्त झाली. हळूहळू ती सर्व मोठी होत असताना वडीलांकडून मिळणाऱ्या संस्काराची शिदोरी आमच्या पाठीशी उभी राहीली आणि त्यांच्या स्वभावाचा कडकपणा व आयुष्याबद्दलची शिस्त, टापटीपपणा, प्रामाणिकपणा यां पैलुंची चाहूल आम्हा मुलांना येऊ लागली.

नोकरीनिमीत्त बदली होत असताना सततच्या शाळा बदल आणि त्यांच्या प्रवेशाबद्दल अहोरात्र प्रयत्न करणारे आमचे वडील व त्यांचा चांगल्या शाळेमध्ये प्रवेश मिळण्यासाठीचा प्रयत्न आम्हास आजही ज्ञात आहे.

आयुष्यामध्ये फक्त आणि फक्त शिक्षणाच्या जोरावरच आपण आपले कुटुंब मोठे करू शकतो याची धारणा मनात ठेवुन तुटपुंज्या असणाऱ्या पगारावरसुध्दा आम्हा तीन्ही मुलांची शिक्षणे (शास्त्र) शाखेतील पदवी, उच्च पदवी पर्यंत पूर्ण केले. आम्हास आजही त्यांनी केलेल्या कष्टाची व टप्प्या टप्प्याने भरलेल्या शाळा कॉलेजच्या फी ची जाणीव आहे. त्यांनी दिलेले संस्कार यांना शब्दात मांडणे हे खरेतर अवघड नसून अशक्य आहे.

आम्ही आमच्या शिक्षणासाठी त्यांच्याबदलीनिमीत्त बरेच फिरलो. नवनवीन गावामध्ये गेल्यामुळे तेथील लोकांचा सहवास, आलेले अनुभव यामुळे जनसंर्पक वाढत गेला. मित्र बनत गेले वेगवेगळ्या परीस्थीतीची जाणीव व उणीव, यामध्ये परिस्थितीशी करावा लागणारा संघर्ष त्यांनी आम्हास शिकविला.

परिस्थितीशी धैर्याने सामोरे जाणे आणि प्रामाणीक प्रयत्नाने त्याच्यावर मात करणे ही आयुष्यातील मोलाची शिकवण त्यांनी दिली. ते स्वभावाने अतिशय प्रेमळ समजुतदार, आणि दयाळु व्यक्तीमत्व होते. त्यांनी आपली मुलगी प्रतिभा हिच्यासाठी शासकीय सेवेत उच्च पदस्थ असलेल्या ईश्वरपूर येथील खानदानी जाधव घराण्यात देऊन तिचे सार्थक केले. आणि त्यांची मुले कु. हर्षदा, कु. श्रेयश यांचीही शिक्षण पुर्ण होऊन चांगल्या कंपनीत ते कार्यरत आहेत.

हे असे आयुष्य पुढे जात असताना त्यांच्या वयाच्या ५१व्या वर्षी आम्हा कुटुंबास फार मोठा धक्का बसला. त्यांना आलेला अर्धांगवायुचा झटका आमच्या सर्व कुटुंबास वेगळ्या वळणावर घेऊन गेला. घरातील कमावता एकमेव स्त्रोत आजारामुळे अंथरुणास खिळुण राहीला. तरीसुद्धा सांगीतल्याप्रमाणे स्वभावात असणाऱ्या जिद्दीच्या जोरावर असल्या अशक्यप्राय आजारावर सुध्दा मात करत कुटुंबाच्या रक्षणासाठी धैर्याने आमचे वडील उभे राहीले.

आजारातून उभे राहील्यानंतर, नोकरीतून स्वयंघोषित निवृत्ती घेऊन ते आमच्यासोबत त्यांच्या विचारांची पेरणी करत आम्हा कुटुंबास उमेद, ताकद, जीवनाशी निगडी विचारांची शिदोरी देत राहीले. त्या दिलेल्या शिदोरीवर आम्ही तीन्ही मुले आपआपल्या पायावर उभे राहून चांगल्या प्रकारे समाजात स्थान निर्माण करू शकलो.

अर्धांगवायुसारख्या गंभीर आजारावर मात करत पुन्हा नव्याने उभे राहण्यात त्यांना यश आले, या आजारातून बाहेर येण्यास आम्हा मामा लोकांची (जाधव घराणे, सदाशिवगड) मोलाची मदत मिळाली, सर्वप्रकारे जमेल तशी मदत वेळेत होत गेलेने आमचे वडील लवकर उभे राहीले:

वडीलांना त्यांच्या मेव्हणांबद्दल (आमचे आदरणीय मामा) असणारा अभिमान नितांत आदर त्यांच्या अधिकारी असण्याचा अभिमान हा आमच्यासाठी आदर्श माणण्याचा सल्ला वडीलांकडून सतत मिळत असे व प्रेरणा देत असे.

आम्ही दोघे भाऊ (प्रशांत व प्रविण) एका विचाराने, वडीलांच्या आदर्श विचाराने पुढे जात असताना त्यांच्या आजाराचे ओझे न मानता सर्व कुटुंबांनी त्यांची मनापासून सेवा केली, त्यामध्ये आमच्या असणाऱ्या अर्धांगीनी (मधुमती आणि ज्योती) यांनी मोलाची साथ दिली. असे सर्व सुरळीत सुरू असताना २०२४ मध्ये हार्टअॅटकमुळे पुन्हा ते आजारी पडले, त्याआजारातून सुद्धा डॉक्टरांच्या सल्ल्यामुळे, ट्रिटमेंटमुळे त्यांना व्यवस्थीत करनेत आमच्या कुटुंबाला यश आहे.

परंतु दररोजच्या वेदना, औषधे या सर्व गोष्टीला हळूहळू कंटाळत, दवाखान्याचा आलेला उबग यामुळे त्यांना जगणेची ढासळलेली उमेद ही सतत जाणवत होती. अखेर १७ ऑगष्ट २०२५ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली.

वडील नावाची चादर आयुष्यातून निघुन जाते तेव्हा आयुष्यातील प्रत्येक सकाळ जबाबदारीची जाणीव करुन देते. त्यांचा घराला असणारा आधार, कुटुंबाची सुरक्षा, त्यांचा आधार, अडचणींच्या काळात मोलाचा सल्ला, दररोजच्या धकाधकीचा जीवनात डोक्यावरुन फिरवलेला मायेचा हात यासर्वांची उणीव सतत जाणवत राहील,

दादा आम्ही सर्व निकम कुटुंबीय आपल्या दिलेल्या शिकवणींचा वसा पुढे नेत तुमच्या लाडक्या नातवांना (कु. यशराज, कु. अधिराज, कु. विराज, कु. स्वराज) त्यांना आयुष्यात यशस्वी व मोठे घडवू. तुमची मेहनत आणि कुटुंबासाठीची समर्पण सदैव ध्यानी ठेऊ. त्यांना अनुभवाचा व ज्ञानाचा उपयोग करुण जबाबदार नागरीक बनऊ.

अस्वस्थ होतय मन
अजुनही येतेय आठवण दादा
तुमच्या अस्तीत्वाचा सुगंध दररोज दरवळत राहो हीच ईश्वरचरणी प्रार्थना !

कळावे –

समस्त
शोकाकुल प्रशांत श्रीरंग निकम
व निकम परीवार.
मोबाईल – ९८२२०९००१४

## उद्योग उभारणीसाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

सातारा : राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित बेरोजगार युवक युवतींची वाढती संख्या व उद्द्योग, व्यवसाय क्षेत्राला राज्यात विविध क्षेत्रात उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगार व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी व कालानुरुप वाव देणारी सर्वसमावेशक मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना आहे. बेरोजगार उमेदवारांनी उद्योग उभारणीसाठी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्रा व महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाकडून आले आहे.



लाभार्थी पात्रता :- सर्वसाधारण अर्जदाराचे कमीत कमी १८ वर्षे पूर्ण असावे. शिक्षण ८ वी पास, वार्षिक उत्पन्नाची अट नाही. वैयक्तीक, भागिदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट/ संस्था सोसायटी स्वयंसहाय्यता बचत गट, नविन उद्योगासाठी योजना लागू आहे.कुटुंबातील एक व्यक्तीस (पती किंवा पत्नी) लाभ घेता येईल. अर्जदाराने यापूर्वी अनुदान समाविष्ट असलेल्या राज्य तसेच केंद्र शासनाच्या महामंडळाच्या योजनेतून लाभ घेतलेला नसावा. अर्ज www.maha-cmegp.gov.in संकेतस्थळावर करावा. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम व इतर योजनांबाबत या कार्यालयात ऑनलाईन प्रस्ताव निशुल्क भरण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

त्यासाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही. तसेच योजनेसाठी जिल्हा उदयोग केंद्र, सातारा कार्यालया-तीलच अधिकृत अधिकारी, कर्मचारी यांचेशी संपर्क साधावा, समाजामध्ये आज अनेक बेरोजगार मुले-मुली असून त्यांना ही महत्वाची संधी असून या संधीचा फायदा घेऊन शासनाच्या उपक्रमात सहभागी व्हावे. विशेष या कामासाठी बाहेरील खाजगी एजंट,दलाल, सल्लागार यांच्याशी संपर्क करण्यात येवू नये याची नोंद घ्यावी

# श्रीरंग विष्णु निकम यांना भावपूर्ण श्रध्दांजली

पोलीस उपनिरिक्षक श्रीरंग विष्णु निकम रा. इंदोली, ता. कराड यांच्या नावापुर्वि कै. अथवा स्व. लिहिण्यास जीव धजत नाही. पण वास्तव हे वास्तव असते, अपरीहार्य असते आणि नाकारताही येत नाही. पण ते स्विकारावेही वाटत नाही. फणसा सारखाच हा माणूस वरून आणि दुरून रूक्ष वाटला तरी आतुन प्रेमळ व हळवा होता. बेरकी वाटला तरी अंतर्यामी अगदीच भोळा भाबडा. लांबून वाघासारखी असणारी गुरगुर निकट सहवासात अगदी पार्शियन मांजरासारखी लोभस आणि प्रेमळ, लाडीक वाटत असे.

माझ्यापेक्षा धाकटी बहिण आक्काताई हिचे हे पती परमेश्वर रविवार दि. १७ ऑगस्ट २०२५ रोजी अचानक आम्हाला कायमचे सोडुन गेले. उण्यापुऱ्या पाऊणशे वर्षांची झुंज संपली. काळ जिंकला. अगदी अचानक ध्यानी मनी नसतांना ही आकाशीची कुऱ्हाड कोसळली. यापुर्वी २५ वर्षांआधी त्यांना अर्धांगवायुचा त्रास झाला, नंतर एकदा हृदयविकाराने आपली शक्ती दाखवली. अधुनमधुन जीवावरील दुखणी आली गेली. पण प्रबळ इच्छाशक्ती व मुले, सूना-नातवंडे यांची सेवा आणि उपचाराचे सातत्य यामुळे सर्व विकारामवर मात करून ते खडखडीत बरे होत गेले. गेल्या महिन्यात अचानक प्रकृती बिघडुन त्यांना आय.सी.यू.मध्ये दाखल करावे लागले पण त्यातुन ते बाहेर आले. हिंडते फिरते झाले. पण १७ ऑगस्टचे रविवारी घरात इकडे तिकडे फिरता फिरता अस्वस्थ वाटु लागले म्हणुन दवाखान्यात नेत असतांनाच त्यांनी आपली साथ सोडली.

वयाच्या पाचव्यावर्षी मातृछत्र हरपले आणि सदाचे पोरकेपण नशिबी आले आणि मग संघर्ष सुरू झाला, उपेक्षीतपणाशी, अडचणीशी अगदी एकाकीपणे. वडील विष्णुपंत निकम हे पोलीस खात्यात होते पण कामाला देव माननारे, हुषार व प्रामाणिक त्यामुळे जिथे जातील तेथील अधिकाऱ्याच्या गळ्यातील ताईत होत गेले. कितीही अवघड केस, तपास असला तरी विष्णुपंताचे वर कागदपत्र तयार करण्याचे सोपवले की वरिष्ठ निर्धास्त असत. त्यांचे घड्याळाला काटा नव्हता पण त्यामुळे पोरक्या श्रीरंगाचा बेरंग झाला होता. वडिलांच्या कायमच्या बदल्या, वेगळी गांवे, वेगळ्या शाळा, नवे शिक्षक, नवे वातावरण यात बाल्य हरपले आणि अकाली प्रौढत्व आले. पण वडलांचे कष्ट, त्यांची कामावरची निष्ठा हे लहानपणापासुन पाहून पाहून श्रीरंग यांचे कर्तृत्वाची भक्कम पायाभरणी झाली.

शालेय शिक्षण संपता संपता नोकरीची अपरिहार्यता जाणवली आणि शिक्षणापासुन दूर जाऊन नोकरीचे जोखड गळ्यात पडले. बिनशिडाचे नावेला बढतीचा किनारा दिसु लागला. पोलीस म्हणुन सुरवात केली पण अधिकारी होणारच हा



विश्वास वाढला. चांगल्या अधिकाऱ्यांचे विश्वासु रायटर, मोठ्या पोलीस ठाण्याचे मुद्देमाल कारकुन असे अनुभव घेत खात्याअंतर्गत फौजदार पदाची परिक्षा उत्तीर्ण होऊन वडिलांचे आणि कुटुंबाचे स्वप्न साकार केले.

स्वत:चे शिक्षणाची आबाळ व अडचणींचा शैक्षणिक प्रवास लक्षात ठेऊन आपली मुले शिकली पाहिजेत. निर्व्यसनी राहिली पाहिजेत असे संस्कार करीत पत्नीचे सहकार्याने तिन्ही मुले उच्चविद्याविभूषीत केली.

१) मोठे चिरंजीव प्रशांत हे पर्यावरण विषयात एम.एस्सी हि मास्टर डिग्री मिळवून व ॲडव्हान्स इंडस्ट्रीयल सेफ्टी डीप्लोमाही घेऊन. जॉन डियर या जागतीक किर्तीच्या ट्रॅक्टर कंपनीत मॅनेजर पदावर कार्य करीत अनेक नव्या योजना अमलात आणतात. त्यांना पर्यावरणातील उत्तम कार्याबद्‌ल दिल्लीचे ''भारत प्राईड अवार्ड'' मिळाले आहे.

२) दुसरे चिरंजीव प्रविण यांनी बि.एस्सी. झाल्यावर नोकरी न शोधता ''निकम कोचिंग ॲकेडमी'' स्थापन केली. कमी उत्पन्न गटातील कमी मार्काची खेड्यातील मुले गोळा करून उत्तम दर्जाचे शिक्षक आणुन मुलांचे मार्कात १५ ते २५ टक्क्यांपर्यंत वाढ करीत आहेत. कराड व कडेगांव येथे ही ॲकॅडमी नांव मिळवत आहे. त्यांचा एक विद्यार्थी आय.पी.एस. झाला. स्वत: सिव्हिल इंजीनीअरींग डिप्लोमा करून शासनमान्य कॉन्ट्रॅक्टर झाले आहेत.

१) यांना देखील ''भारत प्राईड अवार्ड'' मिळाले आहे तसेच त्यांना इंग्लंडचे राजपुत्र ड्युक ऑफ एडीबरो यांचेकडील सोशल सर्व्हिस ॲवॉर्ड मिळाले आहे.

२) डायरेक्ट सेकंड लेफ्टनंट म्हणुन देशातील शेवटच्या ३ जणात समावेश होता. पण नंतर फक्त एकच पद भरले गेले आणि देश एका चांगल्या सेनानायकास मुकला.

३) सौ. प्रतिभा या कन्येने बिएस्सी. करून डि.एम.एल.टी. केले आहे. तसेच जावई श्री. अनिल जाधव, ईश्वरपूर यांनी एम.एस्सी. नंतर सेंट्रल एक्साईज मध्ये अधिक्षकपदाची धूरा सांभाळत आहेत.

४) मोठ्या सूनबाई सौ. मधुमती प्रशांत निकम या एम.ए.बि.एड. असुन ''गणेश इंग्लीश मिडीयम स्कुल'' चिंचवड, पुणे येथे प्राचार्य आहेत.

५) धाकट्या सूनबाई सौ. ज्योती प्रविण निकम या एम.ए. असुन निकम कोचिंग ॲकॅडमीच्या प्रशासकीय कारभार सांभाळत आहेत.

मुलीची दोन मुले उच्चविद्याविभूषीत आहेत आणि दोन्ही मुलांचे ४ मुलगे त्याच वाटेवर आहेत. असे उत्तम शैक्षणिक दर्जा असलेले हे कुटुंब कराड जवळच स्थायीक झाले आहे. श्रीरंग निकमसाहेब यांनी प्रशस्त बंगला बांधुन स्वेच्छानिवृत्ती स्वीकारून आजारांशी लढा देत आनंदी आयुष्य व्यतीत केले आणि कृष्णातीरी अत्यंसंस्कार व्हावेत ही इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. त्याप्रमाणे सर्व कुटुंबींयांनी त्यांची अंतिम इच्छा पूर्ण केली आहे. परमेश्वर श्रीरंग निकम यांचे आत्म्यास चिरंशाती देवो ही ईश्वरचरणी प्रार्थना !

आम्ही पाचही मामा व मी स्वत: व ॲड. दादासाहेब जाधव, डॉ.प्रा. अरूण जाधव, प्रदिप जाधव अतिरिक्त पोलिस अधिक्षक, शरद जाधव सहाय्यक आयुक्त विक्रीकर विभाग व आमची बहिण मंगल जगदाळे पाटील (मावशी) अशी सर्व भावंडे निकम कुटुंबियांच्या पाठीशी सदैव होतो व पुढेही राहू व मार्गदर्शन करू.

**डॉ. विनायकराव जाधव,**
म.पो.से.,
सहा. पोलिस आयुक्त, पुणे.
मोबा. ९९२३४२७७८७

## मित्रपरिवार ज्येष्ठ नागरिकसंघ कराडची मासिक सभा संपन्न

कराड - मित्रपरिवार ज्येष्ठनागरिकसंघ, कराडची रौप्य महोत्सवी वर्षातील आठवी मासिक सभा हॉटेल कृष्णा पॅलेस येथे दि.२४-०८-२०२५ रोजी संपन्न झाली. यामध्ये वनवासी कल्याण आश्रम, तळेरान, ता.जुन्नर, जि.पुणे चे प्रमुख मा.श्री.युवराज ज्ञानोबा लांडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

वनवासी कल्याण आश्रम परिचय,व्याप्ती व आवश्यकता या विषयावर सुंदर व्याख्यान झाले.यावेळी त्यानी भारतातील अतिमागास समाज, आदिवासी, इंग्रजांच्या अधिकाळातील प्रसंगी राजांच्या मागे उभा राहणारा हा लढवय्या मुळचा भिल्ल समाज,पण आपल्या आधुनिक जगापासून दूर जंगलामध्ये असणारा,सध्याच्या आपल्या बोली भाषेतील अतिमागास आदिवासी समाज आपल्या या आधुनिक समाजाच्या प्रवाहात कसा आणता येईल याबद्दल प्रयत्न करून वनवासी कल्याण आश्रम ही संकल्पना पुढे आली. सध्या पंजाब सोडून सर्व राज्यामध्ये यांचे आश्रम सुरू आहेत.याबद्दल व्याख्यानामध्ये युवराज लांडे यानी सविस्तर,



प्रेरक,उद्-बोधक,अशी माहिती दिली. सुरूवातीस खरा तो एकचि धर्म,जगाला प्रेम अर्पावे प्रार्थना झाली.अध्यक्ष प्र.शि.खोचीकर यानी प्रास्ताविक केले.ज्येष्ठ नागरिक,वृद्ध, स्त्रिया,लहान बालकांना आणि आजारी व्यक्तींना त्रासदायक असणा-या ञ्ग, डॉल्बी,ध्वनीवर्धक आणि तत्सम उपकरणे-त्यातून उत्सर्जित होणारे घातक लेसर प्रकाशझोत यावर बंदी आणावी यासाठी निवेदन देणेबाबत माहिती दिली. ज्येष्ठ नागरिक संघाचे हे २५ वे - रौप्य महोत्सवी वर्ष असून त्याद्वारे प्रती माह अखेरच्या बुधवारी १२ गटापैकी एका गटामार्फत सुंदर विशेष कार्यक्रम सादर होतो. गट नं.०८ चे प्रमुख चव्हाण डङ यानी मनोगत व्यक्त केले. रविंद्र गुरसाळे यानी पाहुण्यांचा परिचय करून दिला. श्रीम.सुनंदा मोरे या ज्येष्ठ सदस्यानी पाहुण्यांचा सत्कार केला.या महिन्यातील वाढदिवसा निमित्त सदस्याना शुभेच्छा देण्यात आल्या.श्री.दबडगावकररानी आभार मानले आणि पसायदानाने समारोप झाला.पाहुण्याना दिलेले मानधन त्यानी वनवासी कल्याण आश्रमाकडे जमा केले. यानंतर सुंदर स्नेहभोजनाचा आस्वाद सर्वानी घेतला.यावेळी ७५ सदस्य उपस्थित होते.

## एम.आय.टी.वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी यांचे वतीने डॉ. धनंजय सिंहासने यांचा सत्कार



पुणे - एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक डॉ. विश्वनाथजी कराड यांनी साप्ताहिक कराडवैभवचे संपादक डॉ. धनंजय सिंहासने यांचा त्यांच्या ३७ वर्षांच्या पत्रकारितेतील कार्याचा सन्मान म्हणून तसेच त्यांना इंटरनॅशनल आशिया कल्चरल युनिव्हर्सिटी यांचे वतीने मानद डॉक्टरेट पदवी मिळाल्याप्रसंगी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीतर्फे त्यांचा सत्कार करून त्यांना गौरवण्यात आले. याप्रसंगी त्यांचेसमवेत निवृत्त पोलिस कल्याण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. सुरेश कमलाकर व उपाध्यक्ष डॉ. विनायकराव जाधव उपस्थित होते. या सत्कारामुळे डॉ. धनंजय सिंहासने यांचे अभिनंदन होत आहे.